दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १५१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२५ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना अटक



**दै.रायगड नगरी । रत्नागिरी**

**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी नाशिक येथे दाखल गुन्ह्यात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. नारायण राणे यांना रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वरमधील गोळवली येथून अटक करण्यात आली आहे. राणे यांना स्थानिक कोर्टात हजर करण्यात येणार आहे, असेही सांगण्यात येत आहे. दरम्यान, राणे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज स्थानिक कोर्टाने फेटाळल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयातही धाव घेतली होती. मात्र तिथेही त्यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर तातडीने सुनावणी घेण्यास नकार देण्यात आला आहे. त्यामुळे राणे यांन तूर्त कोणताही दिलासा मिळू शकलेला नाही.**

सत्र न्यायालयाने आणि उच्च न्यायालयाने जामीन नाकारल्याने पोलीस फोर्स वापरून अटकेची कारवाई केली. राणे यांना स्थानिक कोर्टात हजर केल्यानंतर महाड पोलिसांच्या ताब्यात दिले जाणार आहे.

दरम्यान, भाजपकडून सरकारवर गंभीर आरोप करण्यात आला. रत्नागिरी पोलीस नारायण राणे यांना अटक करण्यासाठी आले मात्र त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा अटक वॉरंट नव्हता. पोलीस अधीक्षकांकडे आम्ही

## महाड येथील सत्र न्यायालयात रात्री उशिरापर्यंत सुनावणी सुरू

वॉरंटची मागणी केली. मात्र ते वॉरंट दाखवू शकले नाहीत, असा दावा भाजपचे प्रमोद जठार यांनी केला. राणे यांना अटक करण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकण्यात आला. पोलीस अधीक्षकच तसं बोलले आहेत. कोणत्याही वॉरंटशिवाय केंद्रीय मंत्र्यांवर अशी कारवाई करायला हे काय जंगलराज आहे का?, असा सवालही जठार यांनी केला. जठार माध्यमांशी बोलल्यानंतर काही वेळातच अटकेची कारवाई करण्यात आली. राणे यांची शुगर वाढली होती तसेच रक्तदाबही वाढला होता. त्यामुळे वैद्यकीय तपासणी करून नंतर त्यांना कोर्टाच्या दिशेने नेण्यात आले. यावेळी राणे समर्थकांनी तीव्र विरोध केला. मात्र, पोलिसांनी सर्वांना हटवत कारवाई केली. दरम्यान, राणे यांच्यावरील कारवाईचे वार्तांकन करण्यासाठी आलेल्या माध्यम प्रतिनिधींवर राणे समर्थकांना दोन खुर्च्या फेकल्याने तणाव निर्माण झाला होता. त्यावर प्रमोद जठार यांनी सर्वांची माफी मागत वाद मिटवण्याचा प्रयत्न केला.

## संक्षिप्त...

### दोन डोसमध्ये ८४ दिवसांचं अंतर का?, हायकोर्टाचा केंद्राला प्रश्न

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**


कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी देशभरात वापरात असलेल्या 'कोव्हिशिल्ड' या लसीच्या दोन डोसमध्ये ८४ दिवसांचं अंतर का ठेवण्यात येत आहे? असा प्रश्न मंगळवारी केरळ उच्च न्यायालयानं केंद्र सरकारला विचारलाय.

कोव्हिशिल्डच्या दोन डोस दरम्यान ८४ दिवसांचं अंतर ठेवण्याचा निर्णय लसीच्या उपलब्धतेच्या आधारावर घेण्यात आला आहे की परिणामकारकतेच्या आध-ारावर? या प्रश्नाचं उत्तर केंद्राला उच्च न्यायालयासमोर स्पष्टपणे नमूद करावं लागणार आहे. केरळ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी बी सुरेश कुमार यांनी 'किटेक्स गारमेंटस् लिमिटेड' यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा प्रश्न विचारलाय. या याचिकेत 'किटेक्स'कडून आपल्या कर्मचाऱ्यांना कोव्हिशिल्डचा दुसरा डोस देण्याची मागणी केली होती. आपल्या ५००० हून अधिक कर्मचाऱ्यांना करोना लसीचा पहिला डोस देण्यात आलाय. दुसऱ्या डोसची व्यवस्था कंपनीकडून करण्यात आलीय. परंतु, केंद्र सरकारच्या सद्य नियमांनुसार आपल्याला कर्मचाऱ्यांचं लसीकरण पूर्ण करण्यात अडचणी येत असल्याचं 'किटेक्स'नं आपल्या याचिकेत म्हटलंय. दोन डोस दरम्यान ८४ दिवसांचं अंतराचं कारण 'लसीची उपलब्धता' हे असेल तर, 'किटेक्स'सारखे जे लोक ही लस खरेदी करण्यास सक्षम आहेत त्यांना सद्य प्रोटोकॉलमध्ये ८४ दिवसांची वाट न पाहता दुसरा डोस देण्याची परवानगी दिली जायला हवी, असंही यावेळी न्यायालयानं नमूद केलंय.

## पोलीस ठाण्याची इमारत उद्‌घाटना अगोदरच काढली भंगारात

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे ८५ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेली नवीमुंबई पोलीस आयुक्त हद्दीतील मोरा सागरी पोलीस ठाण्याची नवी इमारत उद्‌घाटना अगोदरच भंगारात निघाली आहे. त्यामुळे शासनाकडून खर्च करण्यात आ-लेला ८५ लाखांचा निधी वाया जातो कि काय असा प्रश्न उरणच्या आमजनतेला पडला आहे.**



> सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता व ठेकेदार यांच्या वर कठोर कारवाई करावी, व इमारतीच्या बांधकामासाठी वाया जात असलेला निधी शासनाने अभियंता व सदर ठेकेदारां कडून वसूल करून घ्यावा.
> **- जयवंत कोळी**
> **मा.सरपंच हनुमान कोळीवाडा**

> मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या बांधकामासाठी ८५ लाखांचा निधी मंजूर झाला होता. परंतु इतर काम हे निधी अभावी रेंगाळत पडलेले आहे. शासनाकडून निधी मंजूर झाला की उर्वरित काम हाती घेतले जाणार आहे.
> **एस.बी.बांगड उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग उरण**

सागरी किनारपट्टी भागातून होणारे दहशतवादी हल्लयां वर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासनाने किणारपट्टी वरील सागरी पोलीस ठाण्याना विशेष महत्त्व प्राप्त करून दिले आहे. त्या अनुषंगाने मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या मोरा, करंजा बंदर आणि घारापुरी परिसरावर नजर ठेवण्यासाठी शासनाने नवीमुंबई पोलीस आयुक्तांच्या हद्दीत नव्याने मोरा सागरी पोलीस ठाण्याची निर्मिती केली. सदर पोलीस ठाण्यासाठी सुसज्ज इमारत असावी, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उरण शहरातील पेन्शन पार्क येथील भूखंडावर शासनाकडून प्राप्त झालेल्या ८५ लाख निधीतून सुसज्ज इमारतीचे बांधकाम २०१८ ते २०२० या वर्षात हाती घेण्यात आले.

परंतु सदर पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या छताला पावसाळ्यात गळती लागली आहे. त्यात शहरात उध्दभवणाऱ्या पुर परिस्थितीचे पाणी सदर इमारतीच्या तळमजल्यावर साचून राहते, .../४

## आज शेकाप कार्यकर्ते करणार भाजपमध्ये प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओवळे विभागातील शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते सुनिलशेठ म्हात्रे तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते गजानन म्हात्रे, तुकाराम म्हात्रे, संतोष म्हात्रे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते बुधवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करणार आहेत.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सकाळी १०. ३० वाजता हा पक्षप्रवेश सोहळा राज्याचे माजी शिक्षण मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### नवी मुंबई पोलीस आयुक्तांकडे मागणी

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना तात्काळ अटक करा : बबन पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल बदनामी कारक वक्तव्य करून समाजामध्ये द्वेष निर्माण केल्याचे विधान केल्याबद्दल केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी, अशी मागणी शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांच्याकडे केली आहे.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल नारायण राणे यांनी बदनामीकारक वक्तव्य करून समाजामध्ये द्वेष भावना निर्माण होईल असे वक्तव्य केलेले आहे. तरी सायबर पोलीस स्टेशन गु.र.नं.३०/२२१ भादवी कलम ५००, ५०५ (२), १५३ ब (१) (क) गुन्हे अंतर्गत तपास करावा. सदर गुन्ह्यातील भारत सरकारचे मंत्री असून त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांच्या विरोधात विधान केलेले आहे. सदर गुन्ह्याची गंभीरता व व्यापकता लक्षात घेवून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना तात्काळ अटक करावी अशी मागणी जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी केली आहे.

## कर्जत कल्याण राज्यमार्गावरील गतिरोधकाची डांबर गेली वाहून


### बांधकाम विभागाचा हलगर्जीपणा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कल्याण राज्यमार्गावर कायम रहदारी असल्याने येथे वाहनांची वर्दळ कायम असते तर अनेकदा येथे अपघात होउन अनेकांनी अपला जीव गमवले आहे. त्यामुळे महत्वाच्या ठिकाणी बांधकाम विभागाकडून गतिरोधक टाकण्यात आले होते. मात्र टाकलेल्या गतिरोधक या पावसात वाहून गेली त्यामुळे अनेक ठिकाणी गतिरोधकाचे डांबर उखडून गेले आहे. त्यामुळे अपघातची भिती व्यक्त होत असल्याने गतिरोधक पुन्हा नव्याने बांधण्यात यावे अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते किशोरभाऊ गायकवाड यांनी केली आहे.

कर्जत कल्याण राज्यमार्ग हा कर्जत तालुक्यातील मुख्य मार्गपैकी एक आहे. त्यामुळे या मार्गावर वाहनांची नेहमी वर्दळ असते कर्जत चार फाट ते डोणे पर्यंत रायगड जिल्हाची हद्द आहे. त्यांच्या पुढे ठाणे जिल्हा हद्दी सुरू होते तसेच कर्जत तालुका फॉर्म हाऊस व माथेरान व वॉटरपॉलनी नैवलोकिक असलेल्या कर्जत तालुक्याची ओळख आहे म्हणून पर्यटकची नेहमीच वरदळ असते गेल्या.

दोन वर्षात कोरोनामुळे रेल्वे ट्रेन बंद असल्याने रस्त्याचा वापर जास्त प्रमाणात वाढली आहे. या मार्गावर अनेक वेळा अपघात होउन जीव गमवले आहे तर काही जण गंभीर जखमी झाल्याची घटना देखील घडल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून या मार्गावर गतिरोधक नव्याने बसवण्याची मागणी जोर धरत आहे. हा राज्यमार्ग असल्यामुळे वर्दळीच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गतिरोधक टाकण्यात आले होते. मात्र पावसाचा जोर आणि मागे अतिवृष्टीमुळे गतिरोधकचे डांबर उखडून गेली आणि बांधकाम विभाग असमर्थ ठरले.



## पनवेल महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी उपाययोजना करावा

### विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी आयुक्ताकड़े केली आहे.



सध्या शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी खाजगी शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी विविध उपाय योजना करताना दिसत आहेत. याउलट पनवेल महानगरपालिकांच्या शाळांची संख्या कमी होत असून विद्यार्थ्यांची पट संख्या घसरत चालली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या शाळेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजाची मुले शिक्षण घेतात. ह्या विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळत नाही. महापालिकेच्या शाळेत प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, संगीत शिक्षण, ग्रंथालय वाचनालय, क्रीडा शिक्षण, आशा अनेक सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांच्या तुलनेने मागे पडत चालला आहे. ह्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर कायम स्वरूपी उंचावण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना महिला बालकल्याण विभागामार्फत राबविण्याची अत्यंत गरज आहे.

कोविड काळात पालिकेच्या शाळातील ५०% विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण घेत आहेत तर ५०% विद्यार्थी मोबाईलची व्यवस्था नसल्याने वंचित आहेत. यासाठी विशेष सभेचे आयोजन करून पालिकेच्या शाळांचा शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. असे निवेदन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी दिले आहे.

## कळंबोलीत १५ वर्षीय मुलाची हत्या

### पोलिसांकडून अज्ञात मारेकऱ्याचा शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली सेक्टर-५ई भागात एका १५ वर्षीय मुलाची अज्ञात व्यक्तीने हत्या केल्याची घटना उघडकिस आली आहे. कळंबोली पोलिसांनी याप्रकरणातील अज्ञात मारेकऱ्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील मृत मुलाचे नाव नितेश दुबेदी (१५) असे असून तो खारघर येथील कोपरा गावात कुटुंबासह रहाण्यास होता. तसेच तो कळंबोलीतील सुधागड हायस्कुलमध्ये इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत होता. लॉकडाऊनमुळे शाळा बंद असल्याने तो सध्या घरीच होता. नितेश दुबेदी हा पुर्वी कळंबोलीत रहाण्यास होता, त्यामुळे त्याचे सर्व मित्र हे कळंबोलीत असल्याने तो नियमित कळंबोलीत आपल्या मित्रांकडे जात होता.

या मित्रांमुळेच त्याला दारू, गांजा, भांग, सिगारेट, बिडी आदींची नशा करण्याची सवय लागली होती. त्यामुळे तो रात्री अपरात्री घराच्या बाहेर जात होता. तसेच उशीरा घरी येत होता तर कधी कधी तो घरी न येता मित्राच्या घरीच राहत होता.

नितेश रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास आपला मित्र प्रतिक याच्यासोबत स्कुटीवरुन निघून गेला होता. मात्र, त्यानंतर तो घरी परतलाच नाही. सकाळी ७ वाजता नितेशचा मृतदेह कळंबोलीतील पुजा भवानी डेअरी समोर आढळुन आला.

या घटनेची माहिती मिळताच कळंबोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पहाणी केली असता, नितेशच्या डोक्यावर हल्ला करुन त्याची हत्या करण्यात आल्याचे आढळुन आले. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

# उन्मादाचे उत्खनन

गेली पन्नासहून अधिक वर्षे पश्चिम बंगाल आणि निवडणूक हिंसाचार हे समीकरणच झाले आहे. बंगालने देशाला बऱ्याच चांगल्या गोष्टी दिल्या. दुर्दैवाने, प्रचारकाळात, मतदान चालू असताना आणि नंतरही किती भयंकर हिंसाचार होऊ शकतो, याची उदाहरणेही बंगालनेच घालून दिली. बिहारमध्ये निकालांनंतर हिंसा होते, तेव्हा त्याचे अनेकांना नवल वाटत नाही; मात्र 'सुसंस्कृत बंगाल'मध्ये खूनबाजी न होता एकही निवडणूक आजवर पार पडलेली नाही. नक्षलबारी या गावात नक्षलवादी चळवळीची सुरुवात, काँग्रेसकडून डाव्यांनी सत्ता खेचणे आणि त्यानंतर डाव्यांना त्याच भाषेत रक्तरंजित उत्तर देणारा ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष, अशी ही हिंसाचाराची चढती भाजणी आहे. भारतीय जनता पक्षही याबाबत तृणमूलपेक्षा कमी नाही. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला ऐतिहासिक विजय मिळाल्यानंतर, जिल्ह्याजिल्ह्यांत जो भयंकर नंगानाच झाला, त्याने कोलकाता उच्च न्यायालयही किती अस्वस्थ झाले आहे, हे ताज्या निकालातून स्पष्ट होते. पाच जणांच्या खंडपीठातील न्यायमूर्तींनी वेगवेगळी निकालपत्रे दिली असली, तरी सर्वांनी एकमताने केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाकडून निकालोत्तर हिंसाचाराची चौकशी करावी, असा स्पष्ट आदेश दिला आहे. या निकालाचे स्वागत करायला हवे. हा निकाल आल्यानंतर एकीकडे सीबीआयने तातडीने चार तपास पथकांची स्थापना केली, तर बंगाल सरकारने निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचे ठरविले. तेथे जो काही निकाल लागायचा असेल तो लागेल; मात्र मनमुराद हिंसाचार करून निवडणुकीतील विजय साजरा करायचा, ही बंगालमधील संस्कृती बदलण्याची गरज आहे. सीबीआयच्या तपासामुळे कदाचित ही प्रक्रिया सुरू होऊ शकते. कोलकाता उच्च न्यायालयात सात याचिका दाखल झाल्या होत्या. यातल्या, निरपराध महिलांवर झालेल्या अत्याचारांच्या कहाण्या धक्कादायक आणि संतापजनक आहेत. एक महिला राज्याचे नेतृत्व करीत असताना महिलांच्या वाट्याला इतके अत्याचार यावेत, हा देशाची मान लाजेने खाली जावी, असा प्रकार आहे. याहूनही वाईट म्हणजे, विजयाच्या उन्मादात तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते हिंसाचार करीत होते, तेव्हा खुद्द ममता बॅनर्जी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कठोरपणे ही हिंसा थांबविण्याची गरज होती. तसे झाले नाही. ते का झाले नाही आणि हिंसा करणाऱ्या जमावांना कोणी पाठिशी घालत होते का, हे सीबीआय तपासात स्पष्ट होईल. सध्या केंद्र व बंगाल सरकार यांच्यात सातत्याने संघर्ष चालू असून, या निकालामुळे त्याला नवा आयाम मिळाला आहे. यासाठीच, सीबीआयने केवळ तृणमूल कार्यकर्त्यांच्या हिंसाचाराची दखल न घेता जिथे भाजपचे उमेदवार विजयी झाले, तेथे झालेल्या अत्याचारांचीही दखल घ्यावी. अशाही गुन्ह्यांचा तपास व्हायला हवा. कोलकाता उच्च न्यायालयाने तपासाचा आदेश देताना सीबीआयला पूर्ण मोकळीक दिलेली नाही, याचेही स्वागत करायला हवे. सीबीआय ही केंद्र सरकारच्या सोयीने काम करते, हा एरवीचा अनुभव आहे. तसे या प्रकरणात न्यायालयीन निगराणीमुळे होणार नाही. या तपास कामावर लक्ष ठेवताना, उच्च न्यायालयाने केवळ याचिकांमध्ये नमूद केलेल्या गुन्हे व अपराधांकडे लक्ष न देता, सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या विरोधात गंभीर गुन्हे दाखल झाले असतील, तर तेही विशेष तपास पथकाकडे वर्ग होतील, हे पाहावे. उच्च न्यायालयाने 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा'ला हिंसाचाराच्या साऱ्या तक्रारींची पडताळणी करण्यास सांगितले होते. आयोगाच्या या अहवालात केलेली अनावश्यक शेरेबाजी व शिफारसी दोन न्यायमूर्तींना आवडलेल्या नाहीत. मानवाधिकार आयोगाने जसे आपल्या मर्यादेत राहणे अपेक्षित होते; तसे निवडणूक आयोगानेही आपले काम नीट करायला हवे होते. बंगालमध्ये निवडणूक आयोगाची खरी पंचाईत एकीकडे केंद्र सरकार आणि दुसरीकडे, रोजच्या रोज संबंध येणारे राज्य सरकार यांच्या कात्रीत सापडल्याने झाली होती. तरीही, निकाल लागत असताना जो हिंसाचार उफाळला, त्याबाबत उच्च न्यायालयाने आयोगावर काहीसा ठपकाच ठेवला आहे. तोही योग्य आहे. जोवर निवडणूक प्रक्रिया पुरी होत नाही, तोवर सारी पोलिस व सुरक्षा दले आयोगाच्या अखत्यारीत असतात. त्यांचा योग्य तो वापर करून, निवडणूक आयोगाने जरब बसवायला हवी होती. प्रसंगी उमेदवारांवर कठोर कारवाई करण्याचे अधिकार आयोगाला असतात; मात्र अलीकडे केंद्रीय निवडणूक आयोगही सुस्तावला असून, राजकीय पक्ष व नेत्यांच्या सोयीने वागतो आहे. आता ममता सरकारने निकालाला दिलेल्या आव्हानाची दखल सर्वोच्च न्यायालय कशी घेते, हे पाहावे लागेल. नेते विजयानंतर उग्र आणि उर्मट होतात; तेव्हा अनुयायी हातात थेट हत्यारे घेतात. बंगालमध्ये तसेच झाले. उच्च न्यायालयाच्या आदेशाने होणारे हे उन्मादाचे उत्खनन अनेक अर्थांनी आवश्यकच होते.

# उरण तहसिल कार्यालय येथील सार्वजनिक बांधकाम खात्याची इमारत बनली खंडर




**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तहसिल कार्यालय आणि पोलिस ठाण्यालागत असलेली इमारत खंडर बनली आहे. त्यामुळे तिथे सापांचा वावर वाढल्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या जनतेच्या आणि कार्यालयामधील कामगारांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिपत्याखाली असणाऱ्या तहसिल कार्यालगत असणाऱ्या इमारतीमध्ये यापूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयाचे कामकाज सुरू होते.

मात्र तेथील अनेक वर्षांपासून कार्यालयाचे कामकाज इमारत मोडकळीस आल्याने करण्यात आले असून सदरचे कार्यालय शासकीय विश्रामगृह येथे हलविण्यात आले आहे. इमारतीचे दरवाजे खिडक्या नाहीशा झाल्या आहेत आजूबाजूला संपूर्ण गवत वाढले आहे.उंदीर खुशीचा वावर वाढून संपूर्ण परिसर पोखरून काढला आहे. इमारत संपूर्ण खंडर बनली आहे.यामुळे या परिसरात सापांचा वावर वाढला आहे. बाजूलाच लगत तहसील कार्यालय आणि पोलीस ठाणे आहे.

दिवसागणित हजारो नागरिकांचा वावर या दोन्ही कार्यालयामध्ये होत आहे. येणारा नागरिक पार्किंग साठी येथे वाहने उभी करत असतात त्या वाहनांमध्ये ही साप घुसण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच या कार्यालमधील कर्मचारी काम करीत असतांना कामामध्ये मग्न असतात. याच वेळेला साप जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे त्यांच्या जीवितास ही धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या खंडर झालेल्या कार्यालयाची मोडकळीस आलेली इमारत नष्ट करून नवीन इमारत बांधण्यात यावी. याशिवाय या ठिकाणी स्वच्छता करावी अशी मागणी नागरिक कर्मचारी करीत आहेत.

# महिलेच्या खुनाप्रकरणी एकास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाशीतील इनऑर्बीट मॉलच्या पाठीमागील बाजुस पामबीचकडुन येणाऱ्या ब्रिजखाली काही दिवसांपूर्वी गळ्यावर व चेहऱ्यावर आघात करून ठार मारलेल्या महिलेच्या मृत्यूचे गूढ उकलण्यात वाशी पोलिसांना यश आले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी कानीफनाथ दिलीप कांबळे नावाच्या (२६), रस्त्यावर राहणाऱ्या व मुळच्या लातुर जिल्हयातील शेडोळ गावचा रहिवाशी असलेल्या आरोपीस अटक केली आहे. दरम्यान, पोलिसांनी अटक केलेला यातील आरोपी दिलीप कांबळे याला डोक्याचे केस उडविणे, मान वरती करणे, चालतांना पाय झटकणे अशा विशिष्ठ हालचाली करण्याच्या सवयी होत्या. तपासाचा हा विशेष धागा पकडून या घटनेचा उलगडा करण्यात पोलिस पथकांना अवघ्या काही दिवसांत यश आले आहे. वाशी पोलिस ठाण्याच्या हद्दीत दि.२ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास इनऑर्बीटच्या पाठीमागील पामबीच कडुन येणाऱ्या ब्रिजखाली अर्धवट शरीर गोणीत तर पाय बाहेर अशा कुजलेल्या अवस्थेतील हत्या केलेला मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाच्या गळयावर कापल्याची जखम तसेच चेहऱ्यावर व डोक्यावर गंभीर जखमा असल्याने नमुद महिलेचा कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी खून केल्याप्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात पोलिसांनी भादवि कलम ३०२,२०१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मनपा रूग्णालयात पाठविला असता, मृत महिलेच्या दोन्ही हातावर विशिष्ठ प्रकारची डिझाईन गोंदवलेली दिसुन आली.

त्याव्यतिरीक्त कोणतेही नाव,पत्ता ओळखण्या इतपत चिजवस्तु, कागदपत्रे मिळुन आले नाहीत. त्यावरून घटनास्थळी मिळालेल्या वस्तु पायातील प्लास्टीक चप्पल मृतदेहाची साडी, ब्लाउज याव्यतिरीक्त कोणतेही ओळख पटवण्याचे साधन पोलीसांकडे नसतांना मृतदेहाची हातावरील गोंदण हाच एक धागा आशादायी वाटत होता.त्यावरून मृतदेहाची ओळख पटवण्याबाबत विविध पोलिस ठाण्यातून हरविलेल्यांची माहिती घेण्याचे काम पोलिसांनी सुरु केले. त्यात पोलिसांना यश येवून मृतदेहाशी मिळत्या जुळत्या वर्णनाची महिला बेपत्ता असल्याची मिसिंग नोंद गोंवडी पोलीस ठाण्यात मिळाली. मात्र यातील मिसींग महिलेचे वय अंदाजे ७० वर्षे होते. तर वाशी पोलिस ठाण्यातील कुजलेल्या अवस्थेतील मृत महिलेचे वय ३९ ते ४० वर्षाचे वाटत असल्याने गोवंडी पोलिस ठाण्यात मिसिंग नोंद असलेल्या महिलेच्या नातेवाईकांना, वाशी पोलिस ठाण्याच्या हद्दीत मिळालेल्या मृतदेहाजवळ पोलिसांना मिळालेले कपडे साडी, ब्लावुज,चप्पल या वस्तू व गोंदलेले डिझाईन आदी बाबी दाखविल्या असता, सदरचा मृतदेह गोवंडीतील बबनबाई शांतीवन कांबळे नावाच्या ७० वर्षीय महिलेचा असल्याचे तिच्या नातेवाईकांनी ओळखले. मृतदेहाची ओळख पटवल्यानंतर नमुद महिलेचा नेमका वावर वाशी भागात कधी होता.

या दृष्टीने वाशी टोलनाका, हायवे, वाशी स्टेशन, ईनऑर्बिट मॉल व शहरातील इतर अनेक ठिकाणांचे सीसीटिव्ही फुटेज पोलिसांनी तपासले असता, दि.२९ जुलै २०२१ रोजी सायंकाळच्या सुमारास बबनबाई कांबळे ह्या एकट्याच इनऑरबिट सिंग्रलच्या आसपास वावरताना दिसल्या. परंतु रात्री ०९.७० वाजण्याच्या सुमारास बबनबाई यांच्या बरोबर एक पुरूष चालत असल्याचे दिसले. सदर संशयीत पुरूषाचा चेहरा स्पष्टपणे दिसत नव्हता. मात्र डोक्याचे केस उडविणे, मान वरती करणे, चालताना पाय झटकणे अशा विशिष्ठ शारिरीक हालचाली तो करत असल्याचे दिसून आले. त्यावरुन पोलिसांनी मागील दिवसाचे फुटेज तपासले असता, आठ ते दहा दिवसाच्या अगोदरच्या फुटेजमध्ये आरोपी हा त्याचा फोटो ओळखण्या इतपत दिसत असल्याने सदरचा फोटो वाशी परिसरातील, हायवेवरील हॉकर्स, भिकारी, रस्त्यावर झोपणारे, रिक्षा चालक अशा शेकडो लोकांना पोलिसांनी दाखविले. त्यादरम्यान पोलिसांना शरीराच्या विशिष्ट हालचाली करणाऱ्या आरोपीबाबत माहिती मिळाली. हा पुरेशा धागा पकडून पोलिसांनी दि. २१ ऑगस्ट रोजी दुपारी हावरे फन्टासीयाजवळ पुलाखालून कानीफनाथ दिलीप कांबळे, याला ताब्यात घेतले असता, महिला बबनबाई कांबळे यांना रात्री जेवणाचे पदार्थ देवुन जेवणासाठी घेवुन जातो असे सांगून इनऑर्बिट मॉल समोरील ब्रिजखाली घेवून तेथे तिच्याशी अती प्रसंग करण्यास सुरुवात केली. त्यावेळी बबनबाई हिने विरोध करून पायाने ढकलुन दिल्यामुळे तेथे बाजुला पडलेल्या काचेच्या तुकडयाने तिच्या गळयावर वार करून तसेच बाजुच्या दगडाने तोंडावर व डोक्यावर मारून हत्या केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला अटक केली असून न्यायालयाने २७ ऑगस्ट पर्यंतची पोलिस कोठडी सुनावली आहे.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सह पोलिस आयुक्त डॉ. जय जाधव, पोलिस उपायुक्त सुरेश मेंगडे, सहायक पोलीस आयुक्त विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश चव्हाण, तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल (गुन्हे) यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन ढगे, पीएसआय योगेश परदेशी, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र मेंगडे, पोलीस हवालदार शैलेंद्र कदम, संजय भाले, रवि पाटील, पोलीस नाईक-सुनिल चिकणे आदींच्या पथकांनी ही कामगिरी यशस्वीपणे पार पाडली.

# मुर्बी गावात लवकरच लसीकरण केंद्र सुरू होणार

**मुर्बी गावात लवकरच लसीकरण केंद्र सुरू होणार**



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासनाकडून १८ ते ४४ वर्ष वयोगटातील सर्व नागरिकांचे लसीकरण करण्याबाबतचा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने खारघर शहरातील लोकसंख्येचा विचार करता खारघरमधील सध्याच्या घडीला कार्यरत असणाऱ्या लसीकरण केंद्रांवर प्रचंड प्रमाणात गर्दी होत आहे. त्यातच मुर्बी गावातील अनेक नागरिकांना अद्याप लसीचा पहिला डोस देखील मिळाला नसून कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांचे लसीकरण होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुर्बी गावात लसीकरण केंद्राची निर्मिती करून प्राधान्याने नागरिकांसाठी लसीकरण सत्राचे आयोजन करण्याची विनंती खारघर शहरप्रमुख शंकर म्हात्रे यांच्यावतीने एका पत्राद्वारे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे करण्यात आली होती.

खा. श्रीरंग बारणे यांनी देखील तातडीने या पत्राची दखल घेऊन पन-वेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्याशी संपर्क साधून तसेच त्यांना लेखी पत्र देऊन मुर्बी गावात लवकरच लसीकरण केंद्र सुरू करण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदरचे पत्र मुर्बी गाव समितीचे अध्यक्ष जगदीश ठाकूर व प्रेम ठाकूर यांनी पालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे सुपूर्द केले. आयुक्त गणेश देशमुख यांनीही लवकरच मुर्बी गावात कोविड लसीकरण केंद्र सुरू करण्याचे आश्वासन दिले असून मुर्बी ग्रामस्थ व शिवसेना खारघर शहरप्रमुख शंकर ठाकूर यांनी आभार मानले आहेत.

# नारायण राणे यांचा केला खांदा वसाहत शिवसेनेने निषेध



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विषयी आक्षेपार्ह व निंदनीय विधान भाजपचे नेते व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केले त्याच्या निषेध करण्यासाठी शिवसेना शहर शाखेतर्फे खांदा कॉलनी शहर पोलीस स्टेशनमध्ये निवेदन देऊन निषेध करण्यात आला.

त्या वेळी सातारा जिल्हा संपर्कप्रमुख एकनाथ ओंबळे, शिवसेनेचे शहरप्रमुख सदानंद शिर्के, उपशहर प्रमुख दत्त-ात्रेय महामुलकर, संपत सुवर्णा, माजी शहरसंघटक दत्तात्रेय कुलकर्णी, उपशहरसंघटक प्रकाश वानखडे, संजीव गमरे, विभाग प्रमुख जयंत भगत, विभाग संघटक श्रीहरी मिसाळ, उपविभागप्रमुख जयराम खैरे, महिला शहर संघटिका सौ सानिका मोरे, उपशहरसघटीका असमा खान, विभाग संघिटका सौ स्मिता घाडगे, अर्चना क्षीरसागर, शाखाप्रमुख सुनील औटी, सचिन धाडवे, अरविंद कासारे, मंगेश पवार उपशाखाप्रमुख जयवंत भायदे, भास्कर साळवी, प्रशांत महाडीक, दिपक चांदिवडे, गटप्रमुख केशव सुवरे, माजी कार्यालय प्रमुख तानाजी घारे, जेष्ठ शिवसैनिक दत्त-ाराम पाटील, युवासैनिक कालिदास कांदळकर, विभाग अधिकारी आभेष ओंबळे इ उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलीस ठाण्याची इमारत उद्घाटना अगोदरच काढली भंगारात


एकंदरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे उद्घाटना अगोदरच सदर इमारत भग्नावस्थेत पडून राहिली आहे.तरी राज्यातील जनतेचा पैसा वाया जातो की काय अशी चर्चा सध्या उरणात रंगू लागली आहे.

राज्य शासनाने मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या नव्या इमारतीसाठी ८५ लाखांचा निधी २०१८ मध्ये मंजूर करुन दिला. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे उध्दघाटना अगोदरच सदर इमारतीच्या छताला पावसाळ्यात गळती लागली असून सदर इमारत उध्दघाटना पुर्वीच अनेक समस्यांनी ग्रासली आहे.

# उरण तालुक्यात प्रतिपंढरपूर समजल्या जाणाऱ्या भेंडखळ येथे हरीनाम सप्ताहाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

टाळ - मृदंग - वीणेचा अखंड झंकार, हरिनामाचा जय घोष भक्ती पूर्ण आणी उत्साही वातावरण परमोच्च भक्तीच्या अव्दितीय सोहळ्याची अनुभूती घेत गेली १५३ वर्षे भेंडखळ गाव हरीनाम सप्ताहाची परंपरा जपतो आहे. सोहळ्याचा शुभारंभ काल दि.२४ ऑगस्ट २०२१ रोजी करण्यात आला. श्री हरीनाम सप्ताह म्हणजे भेंडखळ गावच्या शिरपेचात असलेला मनाचा तुरा, श्रावण कृष्ण प्रतीपदे पासून सुरु झा-लेला हा सप्ताह पुढे गोपाळकला पर्यंत साजरा करण्यात येणार आहे.



हा भक्तीमय सोहळा इतका अप्रतिम असतो की समस्त गावकरीच काय तर संपूर्ण पंचक्रोशीतील भाविक या सोहळ्याची चातक पक्षा प्रमाणे वाट पहात असतात. वाडवडिलांनी घालून दिलेल्या रिती-रिवाजात कोणताही बदल न करता हा सोहळा आजही तरुण पीढी जुन्या जाणत्यांच्या बरोबरीने मोठया उत्साहाने या सोहळ्यात सहभागी होऊन साजरा करतात. दैनंदिन जीवनातील मतभेद विसरून सप्ताहात सामील झा-लेले सभासद एकमेकांची प्रेमाने गळा भेटघेऊन पायांना स्पर्श करून पांडूरंगाला शोधण्याचा प्रयत्न करतात.

पांडूरंग एकमेकाच्या हृदयात आहे. हे पूर्वजांनी हेरले आणि ही प्रथा सुरु केली होती. आज या श्री हरीनाम सप्ताह मंडळात सुमारे ८०० सभासद आहेत. दरसात वर्षांनी नवीन सभासदांची भरती केली जाते. यंदा १५० नवीन सभासदांची नव्याने नोदणी करण्यात आली आहे. एकविसाव्या शतकातही भक्तीच्या डोहात बुडून कोणत्याही अमिषाला बळी न पडता शिस्तबद्ध पद्धतीने १५३ वर्षापूर्वी भेंडखळ गावाच्या पूर्वजांनी कीर्तनाच्या, अभंगाच्या, रंगी रंगताना सुखी समृद्धी सांस्कृतिक परंपरेचाहा लावलेला ज्ञानदीप सपूर्ण भेंडखळ गावाला नाही तर तालुक्याला भक्ती सागरांतील जीवनतला मार्गदर्शक असणारा दिपस्तंब आहे.

पुढची पिढी त्यंच्या कार्याचा वसा समर्थपणे सांभाळीत आहे. गोपाळ काळाच्या दिवशी या सप्ता-हाची सांगता झाली तरी पुढचे दोन दिवस मंदिरांतून टाळ-मृदंग-वीणा यांचे सुस्वर नाद-निनाद घुमत असल्याचा भास होतो. म्हणूनच हा श्री हरीनाम सप्ताह सोहळा नु-सता बघाव्याचा नसतो, तर त्याची अनुभूती घ्यावयाची असते. सदर सोहळ्याचे आयोजन व नियोजन ग्रामस्थ मंडळ भेंडखळ, श्री हरीनाम सप्ताह मंडळ भेंडखळ,आणि ग्रामपंच्यात भेंडखळ यांनी केले आहे.करोनाची महामारी लक्षात घेता मोजक्या भाविकत हा हरीनाम सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी पनवेलहून विशेष बससेवा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी पनवेल एसटी आगारातून पनवेल ते कुडाळ अशी विशेष बस गणेश चतुर्थी निमित्त सोडण्यात येणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ पनवेल रायगड तसेच श्री अविनाश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश चतुर्थी निमित्त पनवेल ते कुडाळ यासाठी एसटी बस दिनांक ८ सप्टेंबर २१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता सोडण्यात येणार आहे. एसटीचे प्रवास भाडे (फिक्स ६८०/ रुपये) पर सीट आहे. तरी सिंधुदुर्गातील गणेश भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सिंधुदुर्ग जि. र.हि. संघ कमिटी यांनी केले आहे.

एसटीचे बुकिंग संध्याकाळी ६.०० ते ९.०० या वेळात संघाच्या कार्यालयात होईल. तसेच आपण संघाच्या प्रतिनिधींशी संपर्क साधू शकता. यासाठी प्रदीप रावले- ७०२०४०१८२१/९९७६५८४४८२, दिपक तावडे- ९९३०६८१६९०, बाबाजी नेरूरकर- ९८१९७११५४१ यांच्याशी संपर्क साधावा.

## तळवली येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय वातावरणात सांगता

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धार्मिक तथा अध्यात्मिक क्षेत्रात नावाजलेल्या श्री क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी येथे पिढ्यांन श्रावण मासानिमित्त संपन्न होणा-या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण या धार्मिक सोहळ्याची शनि.दि.२१ ऑगस्ट रोजी मोठ्या भक्तीमय वातावरणात सांगता करण्यात आली.

शनि.दि.१४ ऑगस्ट ते शनि.दि.२१ ऑगस्ट या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

स्वा.सु.नि.गुरूवर्य ह.भ.प अलिबागकर बाबा, धोंडू महाराज कोलाटकर व गोपाळ महाराज वाजे यांचे कृपात्राखाली व ह.भ.प.दत्तूमहाराज कोलाटकर ( मठाधीपति पंढरपूर ) यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व सांप्रदायाचे कोकण प्रदेशाध्यक्ष ह.भ.प.मारूती महाराज कोलाटकर यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झालेल्या या अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती, स.८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक, सायं. ५ वा.प्रवचन, ७ वा . सामुदायिक हरिपाठ, रात्रौ.९ वा.हरिकिर्तन, तद्नंतर सामुदायिक जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम धार्मिक वातावरणात संपन्न करण्यात आले. तर सप्ताहाचे शेवटी ता.२१ ऑगस्ट रोजी स.१० ते १२ या वेळेत सांप्रदाय कोकण प्रदेशाध्यक्ष ह.भ.प.मारूतीमहाराज कोलाटकर यांचे काल्याचे किर्तन व तद्नंतर महाप्रसाद व सायं. श्रींची पालखी मिरवणूक सोहळ्याने या श्रावण सप्ताहाची सांगता करण्यात आली. या सर्व कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच जय हनुमान क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी मोलाच सहकार्य केले.

# बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्याकरिता प्रयत्नशील : ना.राणे

**दै.रायगड नगरी । माणगाव**



रायगड जिल्ह्यात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या जनआशीर्वाद यात्रेचे स्वागत माणगांव शहरात जल्लोषात करण्यात आले.दि. २३ ऑगस्ट रोजी माणगाव शहरातील ज.गांधी सभागृहात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा स्वागत समारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, माणगाव तालुका भारतीय जनता पार्टी अध्यक्ष संजय (आप्पा) ढवळे, सरचिटणीस योगेश सुळे, माणगाव शहर अध्यक्ष राजू मुंडे व जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे सर्व सेल व सर्व मोर्चे यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अपार मेहनत घेतली.

या जन-आशीर्वाद यात्रे च्या वेळी उपस्थितांना संबोधित करताना केंद्रीय मंत्री नारायण राणे म्हणाले की, माझ्याकडे आलेल्या या मंत्रालयाचा उपयोग मी कोकणातील बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्याकरिता सदैव प्रयत्नशील राहण्याची ग्वाही यावेळी देण्यात आली. मागील ७ वर्ष केंद्रात सत्तेत असणाऱ्या भाजप सरकारने तळागाळातील लोकांपर्यंत पोहचणार्या अनेक योजना आणल्या आणि त्याचे लाभार्थी देखील भरपूर झाले. महागाई हे दरडोई उत्पनावर आधारित असलेले सूत्र आहे. ज्यावेळी उद्योग व्यवसाय ठप्प होतात तेंव्हा आर्थिक मंदीच्या संकटाला प्रत्येक नागरिकाला सामोरे जावे लागते. मागील दीड दे दोन वर्षांपासून देश आरोग्य विषयक संकटात असताना ठप्प असलेली अर्थव्यवस्था यामुळे महागाईची झळ समाजातील सर्व घटकांना बसत आहे. याला केंद्र सरकार जबाबदार असल्याचे म्हणणे चुकीचे आहे असे मत व्यक्त केले.

कोकण किनार पट्टीत असणारे कारखाने बंद का? असा सवाल जनतेने उद्योग मंत्र्यांना विचारावा. कारखाने कसे बंद पडतील आणि दलाली कशी अधिक वाढेल अशी भुमीका राज्याच्या उद्योगमंत्र्यांची आहे असे देखील स्पष्टीकरण केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केले. मागील काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र राज्यात निर्माण झालेला कोरोना वॅक्सिन चा तुटवडा याला मंत्री ते आरोग्य अधिकारी यांनी मागितलेली टक्केवारीच कारणीभूत आहे. यामध्ये लस न मिळाल्याने अनेक नागरिकांना प्राण गमवावा लागला.१२%कमिशन वॅक्सिन कंपन्यांकडून न मिळाल्याने लसीचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला गेला.

केंद्रातील सरकार मागील ७ वर्षे अतिउत्तम व दर्जेदार काम करत आहे.प्रधानमंत्री उजवला योजना,राष्ट्रीय आरोग्य अभियान,स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री किसान विकास योजना, प्रधानमंत्री आवास योजना यासारख्या प्रगतिशील योजना केंद्रसरकर बिगर भ्रष्टाचार प्रणालीने जनतेपर्यंत पोहचवत आहे. या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या समवेत विधानपरिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण, माजी खासदार निलेश राणे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार शाम सावंत, देवेंद्र साटम, बाळासाहेब पाटील, श्रीवर्धन विधानसभा क्षेत्र प्रमुख कृष्णा कोबनाक व भारतीय जनता पार्टीचे दिग्दज पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र प्रदेश भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या सचिवपदी मन्सूर पटेल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजाचे नेते मन्सूर पटेल यांची महाराष्ट्र प्रदेश भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष हाजी एजाज देशमुख व मुंबई अल्पसंख्यांक वसीम खान यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या नियुक्तीबद्दल मन्सूर पटेल यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर तसेच तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची आज (मंगळवार) सदिच्छा भेट घेतली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी मन्सूर पटेल यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, ज्येष्ठ कार्यकर्ते गुलजार पटेल, रायगड जिल्हा अल्पसंख्याक मोर्चाचे सरचिटणीस ॲड. इर्शाद शेख, उपाध्यक्ष नासिर नुरा शेख, तालुका अध्यक्ष मोसीन कर्नाळकर, शहर अध्यक्ष निसार सय्यद. माजी अध्यक्ष इम्तियाज बेग, दानिश बेग, पत्रकार वसीम पटेल, सउद शेख आदी उपस्थित होते.

## तहसील कार्यालयातर्फे ४ लाखांची मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जुलै महिन्यात पनवेल तालुक्यातील शिवणसई येथील किसन झिट्या कातकरी याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्याच्या नातेवाईकांना पनवेल तहसील कार्यालयातर्फे ४ लाखांची मदत करण्यात आली आहे. पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या हस्ते किसन झिट्या कातकरी यांची मुलगी विठाबाई गंगाराम हिलम यांच्याकडे ४ लाखाचा चेक देण्यात आला आहे. यावेळी दुन्द्रे सरपंच अनुराधा वाघमारे, दुन्द्रे तलाठी आर एन मांढरे, मनसेचे विश्वास पाटील, विठ्ठल पाटील उपस्थित होते.

पुरात किंवा नैसर्गिक आपत्तीत वाहून गेलेल्या व्यक्तीस प्रत्येकी चार लाखांची मदत देण्याची तरतूद आहे. त्यामुळे गाढी नदीत वाहून गेलेल्या शिवणसई येथील किसन झिट्या कातकरी याच्या नातेवाईकांना पनवेल तहसील कार्यालयामार्फत चार लाख रुपयांची मदत मिळाली आहे. जुलै महिन्यात शिवणसई येथील किसन झिट्या कातकरी याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्याचा मृतदेह कोप्रोली येथील गाढी नदीच्या किनारी सापडून आला होता. दुसर्या दिवशी पनवेल तालुका पोलिसानी त्याची ओळख पटवली. गाढी नदीला आलेल्या पुरात वाहून गेल्याने त्याचा मृत्यू झाला होता. पुरात किंवा नैसर्गिक आपत्तीत वाहून गेलेल्या व्यक्तीस प्रत्येकी चार लाखांची मदत देण्याची तरतूद असल्यामुळे त्याच्या नातेवाईकांना ही मदत देण्यात आली.

## कोरोना पार्श्वभूमीवर दिघी पोलीस ठाण्यात बैठक

**दै.रायगड नगरी । दिघी**



दिघी सागरी पोलिस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांनी मंगळवारी शांतता समितीची बैठक घेतली. यावेळी त्यांनी येणारे सण साधेपणाने साजरे करावे व पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

यावेळी शांतता बैठकीत परिसरातील विविध मान्यवरांशी संवाद साधतांना म्हणाले की, यंदा ही कोरोनाची पार्श्वभूमी असल्याने ग्रामस्थांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन दहीहंडी व गणेशोत्सव साजरे होतील याची दक्षता ग्रामस्थांनी घ्यावी. उत्सव साजरे होत असताना समाजात शांतता आणि सलोखा राखत अनावश्यक गर्दी टाळावी. सणांमध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास पोलीस कारवाई केली जाईल. असा इशारा ही दिला.

सण-उत्सव पारंपारिक आणि सांस्कृतिक पद्धतीने साजरा करा, उत्सव शांततेत कसा पार पडेल याची काळजी घ्यावी. गरज पडल्यास पोलिसांशी संपर्कात राहून पोलिसांची मदत घेणे अशी सूचना उपस्थित नागरिकांना निरीक्षक पोमन यांनी केली.

यावेळी दिघी सागरी पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत सुकुमार तोंडलेकर, महमद मेमन, मंदार तोडणकर, शब्बीर फकीर आणि पोलीस कर्मचारी व दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व ग्रामपंचायत सदस्य, सरपंच आदी मान्यवर उपस्थित होते.

मुजावर सो.कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर
सौ.निलम विशाल मुंडकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११०९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०९/२०२१

१) श्रीमती.गंगा उर्फ गंगाबाई जोमा पाटील
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.कैलास जोमा पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.राकेश जोमा पाटील
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ रा.मु.तरघर, पो.उलवे,
प्राथमिक शाळेजवळ, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.राखी कुंदन भोईर
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.न्हावेखाडी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ ते ४ यांची आई असून अर्जदार नं.२ ते ४ हे एकमेकांचे सख्खे भाऊ-बहिण आहेत. अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.जोमा राघो पाटील हे दि.१८/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर मयत जोमा राघो पाटील यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : सोनखार, ता.उरण व मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतींच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**अ) संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : सोनखार, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनखार-१०२ | १८ | ४ | ०-०७-६ | २२ |
| २ | | १८ | ७ | ०-३०-४ | |

**ब) संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | उलवे २०० (२) | ६६ | ४ | १-१२-० |
| २ | | ८३ | २ | ०-०१-८ |
| ३ | उलवे २०० (१) | ६५ | ३ | ०-३३-८<br>०-०८-० |
| ४ | | ८२ | ६ | ०-१३-० |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत जोमा राघो पाटील यांस व त्यांच्या इतर सामाईक मालकांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड जोमा राघो पाटील यांच्या मृत्यूपश्चात सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत जोमा राघो पाटील यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२४ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोटाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# पालीत शिवसेना व युवासेना आक्रमक; जनआशिर्वाद यात्रेचे बॅनर फाडले, फासले काळे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उद्धव ठाकरेवरील आक्षेपार्ह विधान भोवले आहे. राणे यांनी उद्धव ठाकरेंवर केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे पाली सुधागड सह सबंध जिल्ह्यात व राज्यात शिवसैनिक चांगलेच खवळले आहेत. सुधागड तालुक्यातील शिवसेना व युवासेना प्रचंड आक्रमक झाली आहेत. राणेंच्या जन आशीर्वाद यात्रेसाठी पालीत ठिकठिकाणी लावलेले बॅनर मंगळवारी (ता.२४) शिवसैनिकांनी फाडून टाकले आहेत. तसेच नारायण राणेंच्या फोटोला काळे देखील फासण्यात आले.

नारायण राणे यांनी बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन कोकण जनाआशीर्वाद यात्रेला पालीतून प्रारंभ केला होता, मात्र



ठिकठिकाणी मुख्यमंत्री ठाकरे व राज्य सरकारवर ते सडकून टीका करीत होते, अशातच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरील आक्षेपार्ह वक्तव्याने शिवसैनिकात उद्रेक झाला व याचे रूपांतर निषेध, घोषणाबाजी, बॅनर फाडणे, पोस्टरला काळे फासने , रास्ता रोको यामध्ये झाल्याचे दिसून आले. पालीत शिवसेना आक्रमक झाल्याचे दिसून आले.

या घटनेमुळे पालीत राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. शिवसेना पाली शहर प्रमुख प्रदीप (दादू) गोळे यांनी सांगितले की नारायण राणेंनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर केलेल्या टिकेमुळे शिवसैनिक व युवा सैनिक संतापले आहेत. हा राग व्यक्त करण्यासाठी व नारायण राणेंचा निषेध करण्यासाठी पालीतील बॅनर फाडले असून राणेंच्या फोटोला काळे फासण्यात आले आहे.

यावेळी शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर अद्याप देखील सुरूच्या झाडांची लागवड नाही

**वनखात्याचे अक्षम्य दुर्लक्ष**

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील वर्षी ३ जून रोजी निसर्ग चक्रीवादळाने श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला जोरदार तडाखा दिला. अंदाजे पंचवीस ते तीस वर्षापूर्वी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील केतकीची बने कमी होऊ लागल्यानंतर वनखात्याने या ठिकाणी गावाचे वाऱ्यापासून संरक्षण व्हावे यासाठी सुरूच्या झाडांची लागवड केली होती. पंचवीस ते तीस वर्षे जुनी असलेली सुरुची झाडे निसर्ग चक्रीवादळा मध्ये संपूर्णतः जमीनदोस्त झाली आहेत. तर काही झाडे अर्ध्या वरून मोडली आहेत. वास्तविक पाहता या वर्षी जून महिन्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर त्या ठिकाणी पडलेली जुनी झाडे उचलून जागा साफ करून नवीन सुरूच्या झाडांची लागवड करणे क्रमप्राप्त होते. परंतु वनखात्याकडून अद्याप पडलेल्या सुरूच्या झाडांची लाकडे उचलण्याचे काम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अजून दोन महिने पावसाळा असणार आहे. त्यामुळे पावसाळा असेपर्यंत वनखात्याने या ठिकाणी सुरूच्या झाडांची लागवड तातडीने करावी. जेणेकरून भविष्यात वादळापासून किनारपट्टीचे व गावकऱ्यांचे रक्षण होईल. समुद्रकिनाऱ्यावरील बहुतांश जागा वनखात्याच्या अखत्यारित आहे. त्या जागेवरती वनखात्याने लागवड करायलाच पाहिजे. परंतु ज्यांच्या खाजगी जागा आहेत अशांना देखील सुरुची रोपे देऊन त्यांना सुध्दा लागवड करायला सांगणे आवश्यक आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.रोहित रमेश साळुंके, रा.खडपाबांध गार्डन, खडपाबांध, फोंडा, गोवा यांचे मालकीच्या फ्लॅट नं.डी-२८, डी विंग, पहिला मजला, सनातन संकुल, गट नं.६८/३, मौजे : देवद, ता.पनवेल, जि.रायगड या मिळकतीच्या दि.०४/०१/२००१ रोजी दस्त क्र.१३१/२०२१ अन्वये नोंदणीकृत केलेल्या खरेदीखताची मुळ प्रत दि.१३/०३/२०२१ रोजी फोंडा, गोवा या परिसरात हरवली / गहाळ झाली आहे.

आमचे अशिलांनी सर्व ठिकाणी शोध घेतला. परंतु त्यांना सदरची मुळ प्रत कोठेही सापडली नाही / आढळून आली नाही. आमचे अशिलांनी सदरची मुळ प्रत हरवले / गहाळ झालेबाबतची तक्रार फोंडा, पोलीस स्टेशनमध्ये दि.२७/०५/२०२१ रोजी नोंदविली असून त्याचा क्र.८०२/२०२१ असा आहे. सदरची मुळ प्रत त्यांनी कोणाही व्यक्तीकडे, बँकेकडे अथवा संस्थेकडे तारण, गहाण ठेवलेली नाही.

सदरची मिळकत ही मौजे : देवद, ता.पनवेल, जि.रायगड येथील असल्याने सदर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर अन्य कुणाचाही गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ वहिवाट, वापर वहिवाटीचा हक्क, इजमेंट, ताबा, बोजा-चार्ज, ॲटॅचमेंट, मनाई आदेश, दंग-दावा, साठेकरार अर अन्य कोणत्याही मार्गाने हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत स्वतःचे हक्क हितसंबंधाविषयी सकृतदर्शनी पुराव्यासह आमच्या खालील पत्यावर आपल्या लेखी हरकती स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सादर कराव्यात किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर सदनिका ही निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजले जाईल व त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, हे सर्व जाहीर व्हावे.

पत्ता : शॉप नं.७, योगेश्वर कृपा को.ऑप.हौ.सो.,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
फोन नं.९९७५५४७२५०/९९३०८८८४०८

सही/-
सौ.अमृता अशोक नाईक
(ॲडव्होकेट व नोटरी)

मा.इंदलकर साहेब यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.धाडस भोपी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.पनवेल यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.८४९/२०२१
ने.ता.२७/०९/२०२१

श्री.रवींद्र रामभज सिंघल — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका, पनवेल
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.सरस्वती रामभज अग्रवाल, यांचा मृत्यू दि.०९/०१/२०१५ रोजी मु.ए.५०३, गॅलेक्सी नेब्युला सोसायटी, सेक्टर १०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांनी आपली आई कै. सरस्वती रामभज अग्रवाल हिच्या मृत्यूची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.पनवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.सरस्वती रामभज अग्रवाल, ह्या मयत आहे किंवा कसे? हे कोणास मजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तार-रखेपासून एक महिन्याचे आत मे.न्यायालयात स्वतः अथवा त्यांचे वकील किंवा कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपल्या हरकती नोंदवाव्यात. या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू १ महिन्याचे मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू मे.न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू मयताचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश देण्यात येईल.

आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोटाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## दिव्यांग विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या सर्व शिक्षा (समग्र) अभियानांतर्गत पुर्व माध्यमिक ते बारावी पर्यतच्या दिव्यांग विद्यार्थांची शारिरीक तपासणी प्रतीवर्षी केली जाते. त्याप्रमाणे तपासणी शिबिर केंद्रीय शाळा मराठी मुलांची शाळा (दगडी शाळा) तळा येथे घेण्यात आले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, तालुका दिव्यांग संघटना अध्यक्ष किशोर पितळे विस्तार अधिकारी साधनव्यक्ती, शिक्षक, जिल्हा शिक्षण समन्वयक श्रीम. मांडे उपस्थित होते. यावेळी सुरेखा तांबट म्हणाल्या कि शासनाकडून शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर असे उपक्रम राबविले जात असून याची अमंलबजावणी करीत असतो. दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहाणार नाही याची शासन काळजी घेत असते शिष्यवृत्ती मदतीस भत्ता, बारावी पर्यंतच्या शिक्षण घेत असलेल्या पालक दिव्यांग असल्यास नियमाप्रमाणे वर्षाला अर्थिक अनुदान दिला जाते. आज प्रथमच शिबिर घेण्यात आले आहे असे सांगितले. किशोर पितळे म्हणाले की शासनाच्या विविध प्रकारच्या उपक्रमातून प्राथमिक शाळेत पाल्यांना प्रवेश घेण्याकडे कल वाढत आहे त्यामुळे शालेय शिक्षणस्तर निश्चितच वाढताना पहायला मिळत असून हा उपक्रम राबविल्यामुळे संघटनाचे वतीने समाधान व्यक्त करून धन्यवाद दिले. सदर शिबीर ॲम्लिको संस्थेमार्फत डॉ.कुसुमदेवी, डॉ.रमणसिंग, डॉ. किसन, डॉ. पंकज मोरे यांनी विद्यार्थी तपासणी करून फिजिओथेरपी ट्रिटमेंट व अवयव तपासणी मोजमाप घेऊन आवश्यक साहित्य तसेच नित्योपयोगी लागणारे साहित्य व्हिलचेअर, कॅलीपर, सी पी चेअर, रोलेटर, एम आर किट हे मोफत वाटप केले जाते.तालुक्यातील ९० प्राथमिक शाळा व १३ हायस्कूल मधील १७५ दिव्यांग विद्यार्थी असून १००% तपासणी झाली आहे. असे दिव्यांग समावेशीतसाधनव्यक्ती नारायण शिरसाट सर यांनी सांगितले. सदर शिबीर संपन्न करण्यासाठी शैलजा साठे, नारायण शिरसाट, साधनव्यक्ती, विविध शाळांतील मुख्याध्यापक शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

### माथेरान येथील पाणीपुरवठा देयकांकरिता

## अभय योजना लागू करण्याबाबत शासन सकारात्मक : ना.गुलाबराव पाटील

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान येथील योजनेतील ग्राहकांच्या पाणीपुरवठा देयकांकरिता अभय योजना लागू करण्याबाबत शासन सकारात्मक आहे असे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. माथेरान पाणीपुरवठा देयकासंदर्भात मंत्रालयात पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

माथेरान येथील प्रलंबित पाणीपुरवठा देयकांवरील व्याजात सवलत देण्यासाठी व योजनेच्या ग्राहकांना पाणीपुरवठा देयके भरण्यास प्रोत्साहित करण्यासाठी अभय योजना लागू करण्याचा शासनाचा मानस आहे. त्याबाबत कार्यवाही सुरू असून लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे पाटील यांनी सांगितले. नगराध्यक्षा यांनी गेली १० वर्ष च्या वर रखडलेल्या पाणी योजना, तसेच माथेरान हे १००% पर्यटनावर अवलंबून असणारे पर्यटन स्थळ असून लोकडाऊनमुळे तिथल्या रहिवासी तसेच लॉज धारक, हॉटेल व्यावसायिक इत्यादींना आर्थिक परिस्थिती ला सामोरे जाण्यास अडचण होत आहे त्यामुळे जुलै पासून च्या १०% दरवाढीस स्थगिती देण्यात यावी आणि लोकडाऊन च्या काळात वाणिज्य कर लावू नयेत, तसेच सिम्पसन टँक चा प्रस्ताव ही शासन दरबारी देणार आहोत अशी मा मंत्री महोदय यांना विनंती केली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ठाणे येथील मुख्य अभियंत्यांनी पुढील आठवड्यात प्रत्यक्ष माथेरानला जाऊन पाणी पुरवठा योजनेची तसेच सिम्पसन टँक याची पाहणी करावी असे निर्देशही मंत्री पाटील यांनी दिले. त्यांच्या भेटीनंतर आपण स्वतः पुढील महिन्यात या योजनेची पाहणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी माथेरानच्या नगराध्यक्ष श्रीमती प्रेरणा सावंत, माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी, गटनेते प्रसाद सावंत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किशोरराजे निंबाळकर, पाणी पुरवठा विभागाचे सहसचिव प्रवीण पुरी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ठाणेचे मुख्य अभियंता प्रकाश नंदनवरे, कार्यकारी अभियंता विजय सूर्यवंशी, माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत जाधव आदि उपस्थित होते. सदर शासन दरबारी बैठक लावण्या संदर्भात माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी आणि माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी विशेष प्रयत्न केले.

## नारायण राणे यांच्या आक्षेपार्ह विधानाचा तळा शिवसेनेतर्फे निषेध



**दै.रायगड नगरी । तळा**

केंद्रीय लघु, सूक्ष्म व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी मुख्यमंत्र्यांबद्दल केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा तळा शिवसेनेतर्फे निषेध व्यक्त करण्यात आला. नारायण राणे यांनी जनआशीर्वाद यात्रेदरम्यान महाड येथे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्याचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले असून सर्वत्र त्यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात येत आहे.

तळा तालुक्यातील शिवसैनिकांकडून नारायण राणे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शिव-सेना शाखेपासून बळीच्या नाक्यापर्यंत शिवसैनिकांनी राणे यांचा प्रतिकात्मक पुतळा बनवून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी तहसीलदार यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले तसेच नारायण राणे यांना अटक केले नाहीतर येत्या दोनदिवसांत शिवसेनेतर्फेआंदोलन करण्यात येणार असल्याचे तालुका प्रमुख यांनी सांगितले.

याप्रसंगी तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, उपनगराध्यक्ष सायली खातू नगरसेविका नेहा पांढरकामे, नंदिनी खातू गणेश तळेकर, सहदेव पारधी, संदीप दळवी मंगेश शिर्के विभागप्रमुख शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या निषेधार्थ खारघरमध्ये शिवसेनेचा निषेध मोर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केलेल्या आक्षेपार्य विधानामुळे सर्व महाराष्ट्रभर शिवसैनिक संताप व्यक्त करत आहेत. तसेच त्यांच्या बद्दल अत्यंत हीन दर्जाचे आक्षेपार्य विधान केले असून या अनुषंगाने शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत (पनवेल विधानसभा) यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पनवेल विधानसभा यांच्या वतीने राणे यांच्या विरोधात खारघर येथे जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले.

तसेच नारायण राणे यांच्या विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी खारघर पोलीस ठाणे येथे निवेदन देण्यात आले.

सदर आंदोलनास जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्यासह उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, यतीन देशमुख, सर्व शहर प्रमुख, उपशहर प्रमुख, युवासेनेचे उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, विधानसभा अधिकारी पराग मोहिते, सर्व शहर अधिकारी,, महिला आघाडीच्या विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, उपतालुका संघटिका सौ. टीया अरोरा-धुमाळ, उपमहानगर संघटिका सौ. रीना पाटील, शहर संघटिका सौ. अपूर्वा प्रभू, विभाग संघटिका सौ. संगीता राऊत आदि शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नागोठण्याजवळील मांडवशेत आदिवासी वाडीत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

### आरोपीला चार दिवसांची पोलिस कोठडी

**दै.रायगड नगरी । वाकण**

मुलगी अल्पवयीन आहे हे माहित असूनही तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी सर्वेश संतोष पवार (वय १८) रा. मांडवशेत आदिवासी वाडी, पो. ऐनघर, ता. रोहा या आरोपीवर बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण कायदा २०१२ व भा.दं.वि. संहितेच्या कलम ३७६ च्या विविध कलमांखाली नागोठणे पोलिस ठाण्यात २३ ऑगस्ट, २०२१ रोजी रात्री गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नागोठणे पोलिसांकडून आरोपीस अटक करुन मंगळवारी(दि.२४) रोहा येथील फौजदारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाकडून आरोपीस २७ ऑगस्ट पर्यंत चार दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

यासंदर्भात नागोठणे पोलिस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार १५ वर्ष वय असलेल्या नागोठण्याजवळील मांडवशेत (ता.रोहा) येथील अल्पवयीन मुलीशी ती अल्पवयीन आहे हे माहीत असूनही आरोपी सर्वेश पवार याने तिच्याशी प्रेमसंबध ठेवले.

तसेच तिला लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्याशी तिच्या मांडवशेत येथ-ीलच घरात २३ मार्च, २०२१ ते २३ ऑगस्ट, २०२१ दरम्यान या मुलीशी तिच्या मनाविरूद्ध वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित करुन या मुलीस ५ ते ६ महिन्यांची गर्भवती ठेवली. याप्रकरणी मुलीच्या आईच्या तक्रारी वरुन सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याची माहिती मिळताच रोहाचे उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी यांनी नागोठणे पोलिस ठाण्यात भेट देऊन सदर गुन्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाण्यातील स.पो.नि. विजयकुमार देशमुख हे पुढील तपास करीत आहेत.

## पंतप्रधानांनी नारायण राणेंना त्वरित निलंबित करावे : विष्णू पाटील

### पेणमध्ये शिवसैनिकांनी राणेंच्या प्रतिमेला काळे फासले

**दै.रायगड नगरी । पेण**

उद्धव ठाकरे हे महाराष्टाचे मुख्यमंत्री असून ते हिंदू हृदयसम्राट बाळासाहेबांचे पुत्र आहेत. तसेच बाळासाहेब हे नारायण राणेंचे गुरू आहेत. गुरू पुत्रावर असे बेताल भाष्य करणे हे निंदनीय असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्वरित केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना निलंबित करावे अशी मागणी माजी जिल्हा प्रमुख विष्णुभाई पाटील यांनी केली आहे. पेण मध्ये शिवसैनिकांनी राणेंच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त केला.

पेण येथील कोतवाल चौकात नारायण राणे यांच्या विरोधात संतप्त शिवसैनिकांनी घोषणाबाजी करून संताप व्यक्त करून निषेध केला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या प्रतिमेला संतप्त शिवसैनिकांनी पेणमध्ये काळे फासून चपलेने बदडले. नीम का पत्ता कडवा है नारायण राणे भडवा है, भाजपचा नाचरा मोर नारायण राणे कोंबडीचोर, गद्दार है गद्दार है नारायण राणे गद्दार है, उद्धव साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, जिंदाबाद जिंदाबाद शिवसेना जिंदाबाद अशा जोरदार घोषणाबाजी करून राणेंच्या प्रतिमेला काळे फासुन व चपलेने बदडुन संतप्त शिवसैनिकांनी राणे यांच्या वक्तव्याचा निषेध केला.

यावेळी प्रतिक्रिया देताना माजी जिल्हाप्रमुख विष्णुभाई पाटील यांनी सांगितले की, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे फक्त महाराष्टाचे मुख्यमंत्री नसून ते हिंदू हृदयसम्राट बाळासाहेबांचे पुत्र आहेत. तसेच हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब हे नारायण राणेंचे गुरू आहेत. बाळासाहेबांमुळेच राणे हे मुख्यमंत्री झाले होते. त्यामुळे गुरू पुत्रावर असे बेताल भाष्य करणे हे कुठल्याही ग्रंथांत नसून निंदनीय आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्वरित केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना निलंबित करावे अशी मागणी माजी जिल्हा प्रमुख विष्णुभाई पाटील यांनी केली आहे. पेण मध्ये शिवसैनिकांनी राणेंच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त केला.




नारायण राणे यांच्या बेताल वक्तव्यामुळे शिवसैनिकांच्या भावना अधिक तीव्र झाल्या असून नारायण राणे यांनी माफी मागावी अन्यथा त्यांच्या गाड्या कोकणाच्या प्रवेशद्वार असलेल्या पेण येथील महामार्गावर शिवसैनिक रोखतील असा इशारा उपजिल्हाप्रमुख नरेश गावंड यांनी दिला. राणे यांनी केवळ मुख्यमंत्रीपदाचा अपमान केला नसून संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचा अपमान केला आहे. भाजपने केवळ शिवसेनेवर विष ओकण्याकरिता राणे ना-वाचं बांडगुळ पाळले आहे. आता शिवसैनिक पेटून उठला आहे. नारायण राणे यांनी माफी न मागितल्यास त्यांची जन आशीर्वाद यात्रा शिवसैनिक रोखतील असा इशारा तालुकाप्रमुख अविनाश म्हात्रे यांनी दिला. नारायण राणे यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी पेण शिवसेनेच्यावतीने लेखी निवेदनाद्वारे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, उपविभागीय पोलिस अधिकारी विभा चव्हाण यांच्याकडे करण्यात आली.

## नारायण राणेंना तात्काळ अटक करण्याची शिवसैनिकांची मागणी

### अन्यथा शिवसैनिक आंदोलनाच्या पावित्र्यात

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शिसेनापक्ष प्रमुख ना. उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अनउद्गार काढल्या प्रकरणी केंद्रीय मंत्री ना. नारायण राणे यांना तात्काळ अटक करा, अन्यथा शिवसेना आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे पत्र श्रीवर्धन तालुका संघटनेच्यावतीने श्रीवर्धन तहसीलदार व पोलीस प्रशासन यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

कोकणात केंद्रीय मंत्री ना. नारायण राणे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भाजपच्या जन आशीर्वाद यात्रेत महाड येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना नाव न घेता त्यांच्या लगावली असती असे वक्तव्य करून खालच्या शब्दांत टीका केली. याचा तीव्र निषेध म्हणून शिवसेना श्रीवर्धन तालुका संघटनेने



तहसीलदार कार्यालय येथे नारायण राणे यांच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांना तात्काळ अटक करून कारवाई करण्याची मागणी शिवसेना तालुका संघटनेने केली आहे. तात्काळ कारवाई करा अन्यथा शिवसेना आंदोलन करणार असल्याचा इशारा पत्राद्वारे दिला आहे. कारवाईच्या मागणीचे पत्र श्रीवर्धन तहसीलदार व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्याकडे तालुका संघटनेने पत्र सुपुर्द केले यावेळी शिवसेना तालुका प्रमुख प्रतोश कोलथरकर, माजी आमदार तुकाराम सुर्वे, नगरसेवक अनंत गुरव, प्रीतम श्रीवर्धनकर, उपशहरप्रमुख अजिंकेश भाटकर, आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## वृद्ध महिलेचे दागिने खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार सायकलवरुन आलेल्या दोघा इसमांनी एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील ९० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून पसार झाल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

श्रीमती.रेणुका वेलायुदम (६८ रा.सेक्टर ३५ कामोठे) या भाजी घेवून सोबतच्या सहकारी महिलेसोबत पायी जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या एका इसमाने खाली उतरुन त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून ते मोटार सायकलवरुन पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## राणे यांच्या त्या वादग्रस्त विधानाचे माणगावात पडसाद

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

केंद्रीय मंत्री नामदार नारायण राणे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांच्या बद्दल महाड येथे आलेल्या भाजपाच्या जन आशिर्वाद यात्रा दरम्यान केलेल्या त्या वादग्रस्त विधानाचे संपूर्ण रायगड जिल्ह्याप्रमाणे माणगांवातही तीव्र पडसाद उमटले. तालुका शिवसेनेच्या वतीने शहरात पोलीस चौकीसमोर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या पोस्टर प्रतिमेस जोडे मारुन, राणेंना अटक करा, उध्दव साहेब आगे बढो ! अशी जोरदार घोषणाबाजी करीत जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख गजानन अधिकारी, शहर प्रमुख अजित तार्लेकर, माजी जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, उपसभापती सुजित शिंदे, युवा सेना तालुका अधिकारी कपिल गायकवाड, इंदापुर विभाग प्रमुख दांडेकर, युवा सेना शहर अधिकारी अजिंकेश जाधव उपशहर प्रमुख अनिल सोनार तसेच अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

